# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक २०.५.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

(प्रशासकीय विषय)

**विषय क्रमांक १४ :-** अमरावती स्थित मौजे कॅम्प नझुल शिट क्रमांक १३ मधील भुखंड क्रमांक १ येथील क्षेत्र ०.८० हे.आर जागेवरील मंजुर विकास योजना (सु.) मधील वि.यो. आरक्षण क्रमांक १३३ महापौर बंगल्याचे आरक्षण वगळुन कमर्शियल कॉम्पलेक्स व हॉस्पिटल करीता जागा आरक्षित करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे बाबत.

**ठराव क्रमांक १४ :-** अमरावती स्थित मौजे कॅम्प नझुल शिट क्रमांक १३ मधील भुखंड क्रमांक १ येथील क्षेत्र ०.८० हे.आर जागा महापौर बंगल्याकरीता महानगरपालिकेने खरेदी खत क्रमांक १९८६ दिनांक ४/७/१९९७ रोजी खरेदी केलेली आहे. सदर्हु जागा आज रोजी अमरावती महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. अमरावती शहराच्या मंजुर विकास योजना (सु.) नुसार सदर्हु जागा विकास योजना आरक्षण क्रमांक १३३ महापौर बंगल्याकरीता प्रस्तावित आहे. सदर जागेवर महानगरपालिका प्रशासना मार्फत कमर्शियल कॉम्पलेक्स व हॉस्पिटलचे बांधकाम करावयाचे आहे. करीता सदर जागा वि. यो. आरक्षण क्रमांक १३३ महापौर बंगला या आरक्षणातुन वगळुन कमर्शियल कॉम्पलेक्स व हॉस्पिटल करीता समाविष्ट करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास शहर सुधार समिती मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु, सद्यस्थितीत शहर सुधार समिती अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार नागरिकांचे हरकती व सुचना नोंदवुन त्याबाबत फेरबदलाचा प्रस्ताव तयार करुन अंतिम ठराव पुन्हा मान्यते करीता नियोजन प्राधिकरणाकडे न पाठवता सरळ फेरबदल प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर प्रशासकीय विषयास मा. आयुक्त यांनी दिनांक १९.०५.२०२२ रोजी मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार सदर्हु प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे

**स्वा/-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा/-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.